# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/04/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत ०१ कि. मी अंतरावर दत्त मंदीरचे मागे इतवारीपेठ उमरेड येथे दिनांक १२/०४/२०२३ चे २१.०० वा. ते २१.१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. ललीता ईश्वर मांढरे, वय ३४ वर्ष रा. दत्तमंदीरचे मागे ईतवारीपेठ उमरेड हिचा पती **मृतक नामे— ईश्वर चैतुजी मांढरे वय ५२ वर्ष रा. दत्तमंदीरचे मागे ईतवारीपेठ उमरेड** हा अंगणात सिमेंट गट्टु काढुन बाजुला ठेवत असतांना त्या कारणावरून व जुन्या घरगुती वादाच्या रागातुन यातील आरोपी **क्र. १) (मृतकाचा भाऊ) नामे— रामदास चैतुजी मांढरे, वय ५५ वर्ष,** व **आरोपी क्र. २ (आरोपी क्र. १ चा मुलगा) नामे— २) शंतनु रामदास मांढरे वय १८ वर्ष दोन्ही रा. दत्तमंदीरचे मागे ईतवारीपेठ उमरेड** यांनी संगणमत करून मृतका सोबत झगडा भांडण करून आरोपी क्र. १ याने लाकडी कुऱ्हाडीचा दांडयाने व लाठीने तसेच आरोपी क्र. २ याने मृतकाचे छातीवर व पोटावर चाकुने वार करून मृतक यास जिवानिशी ठार मारले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे कलम ३०२, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि. दिनेश खोटेले पो.स्टे. उमरेड हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. कोंढाळी :— अंतर्गत १८ कि.मी. अंतरावरील मौजा मुर्ती येथे दिनांक १०/०४/२०२३ चे १०.०० वा. ते १२/०४/२०२३ चे १८/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— अमित गणेशराव गाडेरे, वय ३६ वर्ष रा. मुर्ती ता. काटोल जि. नागपूर याने **आरोपी नामे— १) चंदु देवासे, वय ३८ वर्ष रा. वलनी २) चंदु वाहने, वय २८ वर्ष रा. लाडगाव ता.काटोल जि. नागपूर** दोन्ही नोकरांना ठेक्याने आपल्या घराचे पेंटींगचे काम दिले असता फिर्यादी यांच्या घराच्या बेडरूममध्ये गादीखाली ठेवलेले रोख रक्कम ३८,०००/— रू. व तिन तोळयाचे सोन्याचे मंगळसुत्र व दोन ग्रॅमचे सोन्याचे कानातले अंदाजे किंमती ४०,०००/— रू. एकुण किंमती ७८,०००/— रूपयाचा मुद्देमाल वरील आरोपींनी संगणमत करून चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३८१, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ. भोजराज तांदुळकर मो. नं ९९२२३१४४४२ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. कुही** :– अंतर्गत २३ कि. मी. अंतरावरील मौजा कुही फाटा पराते हयाचे पोल्टीफार्मचा बाजुला दिनांक १०/०४/२०२३ चे ०१:५० वा. दरम्यान यातील घटना ता. वेळी व ठिकाणी अज्ञात आरोपीने ३ नग जुन्या पॅनासॉनिक कंपनीच्या बॅटऱ्या किंमती अंदाजे १५०००/– रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– कमलाकर रमेश थोटे, वय ३५ वर्ष, रा. गजानन नगरी ता. उमरेड यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ बन्सोड पोस्टे कुही मो. नं. ९६७३६०८६४२ हे करीत आहे.

## जबरी संभोग

**पो.स्टे. केळवद** :– दिनांक २६/०२/२०२३ चे ११/०० वा. ते १६/०० वा. दरम्यान वय १६ वर्ष ०५ महिने फिर्यादी/पीडिता व आरोपी नामे– प्रविण लहारे रा. नागपुर यांचे यांचे सप्टेबर २०२२ पासुन मोबाईलवर बोलण्यामुळे यांची मैत्री झाली होती. वर नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने फिर्यादीस फोनवरून नागपुर येथे बोलावले व नागपुर मधील हॉटेल मध्ये गप्पागोष्टी करण्याचे बहाण्याने नेले व तेथे फिर्यादीशी जबरदस्तीने शारीरीक संबंध केले. व आरोपीने फिर्यादीस कोणालाही सांगु नकोस असे सांगीतले. फिर्यादीचे आईला याबाबत शंका आल्याने फिर्यादीस विचारपुस केली असता फिर्यादीने घडलेली हकिकत तिच्या आईला सांगीतली व फिर्यादीचे आईने फिर्यादीस धिर दिल्याने फिर्यादीने आपले आई व नातेवाइकांसोबत पोस्टेला येऊन आरोपीविरूध्द तोंडी रिपोर्ट दिल्याने सदर गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ३७६(१), ३७६(२) (एन) भादवी सहकलम ६ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा तपास सपोनि. फुलेकर सा. पो. स्टे. सावनेर करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. अरोली** :– दिनांक १२/०४/२०२३ चे २३/३० वा. दरम्यान फिर्यादी/पीडिता वय ३५ वर्ष ही अकराव्या वर्गात अरविंदबाबु देशमुख महाविदयालय भारसिंगी येथे शिक्षण घेत आहे. फिर्यादीला सावत्र आई असुन लहान सावत्र भाऊ आहे. फिर्यादीचे ईयत्ता १० वी पर्यंतचे शिक्षण हे संत कबीर विद्यालय, रोहणा येथे झालेले आहे तसेच फिर्यादीचे दहाव्या वर्गाचे बोर्डाची परीक्षा ही १५ मार्च ते २५ एप्रिल पावेतो होती दरम्याण फिर्यादीचे सेंटर सुद्धा संत कबीर विद्यालय, रोहणा परिक्षेकरीता होते संत कबीर विद्यालय, रोहणा येथे सकाळी १०.०० वा. पेपरला पायदळ जात असताना कॉलेजमधुन घरी जात असंताना कॉलेजचे गेटचे समोर येवुन **आरोपी नामे– शैलेश गुणवंत खजुरीया, वय २२ वर्ष, रा. मायवाडी ता. नरखेड जि. नागपूर** याने म्हटले की “तु माझे सोबत लग्न कर नाहीतर मी मरून जाईन, नाही तर तुझी बदनामी करीन” असे म्हणुन तो मोटर सायकल घेऊन निघुन गेला, त्यानंतर सुद्धा त्यांनी फिर्यादीला पाच ते सहा वेळा अशाचप्रकारे म्हटले होते. पेपर देण्यास जाते वेळी तो फिर्यादीचा नेहमी पाठलाग करून अशी धमकी नेहमी देत होता घटनेची माहिती फिर्यादीने आपल्या घरी वडीलांना दिली तसेच फिर्यादीने आपल्या कुटंबीयांसोबत पोलीस स्टेशन जलालखेडा येथे तक्रार दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४(अ), ५०४, ५०६ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास मपोहवा गेडाम या करीत आहे.

# पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**१) पो.स्टे. काटोल :–** दिनांक १२/०४/२०२३ चे ०९/३० वा. ते ११/०० वा. दरम्यान फिर्यादी व त्यांची पत्नी कामावर गेली होती व भाउ शाळेत गेला होता व मुलगी घरी एकटी असता घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीची अल्पवयीन मूलगी वय १६ वर्ष ०७ महिने हिला फिर्यादीचे कायदेशिर रखवालीतुन कोणीतरी अज्ञात इसमाने फूस लसवून पळवून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास PSI लोखंडे मो. नं. ७७२१९८१४३०० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. अरोली :–** दिनांक १२/०४/२०२३ चे ०९/०० ते १५/०० वा. चे सुमारास फिर्यादीची मुलगी वय १७ वर्षे ही विश्वमेघ विदयालय धर्मापुरी येथे १२ वी पर्यंत शिक्षण घेतले असु ती सध्या घरीच राहते दिनांक १२/०४/२०२३ रोजी सकाळी ०९.०० वा. सुमारास फिर्यादी व तिचा पती व मुलगी असे तिघेही जन मिळुन फिर्यादीचे माहेरी येथे वडीलाला दिलेले हात उसने पैसे आणने कामी गेली होती व लहान मुलगी ही फिर्यादी चे सासुचे घरी गावात गेली होती मोठी मुलगी ही घरी जावुन पाहीले असता एकटीच हजर होती फिर्यादी दुपारी अंदाजे ०३/०० वा. चे दरम्यान गावी खात येथे परत आली तेव्हा घरातील दरवाजा लावलेला होता फिर्यादीने आजुबाजुच्या घरी जावुन विचारपुस केली असता ती हजर नव्हती. सायंकाळी ७/०० वा. पर्यत सुमारास गावात इतरत्र शोधाशोध केली व फोनव्दारे विचारपुस केली असता मिळुन आली नाही कोणीतरी अज्ञात आरोपीने फुस लावुन पळवुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोहवा गेडाम मॅडम ब. नं १६० पो स्टे अरोली मो. नं. या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**